—: नि.दि.मु.नं. १४/२०१२ मधील निशाणी ५ वरील आदेश :—
( घोषित दिनांक १३/०५/२०१३)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तुर्तातुर्त ताकिद मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. संक्षिप्तमध्ये अर्ज असा की, मौजे आंगणेवाडी, ता. मालवण येथील सर्व्हे नं. ४५(७३४) हिस्सा नं. २८/१३, क्षेत्र हे.०.११.० आर, आकार रु.०.०५पैसे, येणेप्रमाणे मिळकत ही ''दावा मिळकत'' आहे. दावा मिळकत ही पूर्वी मसुरे गांवामध्ये होती. मसुरे या गांवाचे विभाजन झाल्यामूळे दावा मिळकत ही आंगणेवाडी गांवाच्या अधिकार क्षेत्रात आलेली आहे. दावा मिळकत ही पूर्वी संभाजी कृष्णाजी आंगणे यांच्या मालकीची होती. त्यांचे पश्चात ती अनुसया संभाजी आंगणे यांचेकडे वारसाहक्काने आली. दुरुस्त आकारफोडपत्रक क्र. ४९, दि. ०७/०८/१९६३ रोजी सदर वाद मिळकतीबाबत झालेले आहे. सदर अनुसया संभाजी आंगणे हिला कुसुम नांवाची एकमेव मुलगी वारस होती. सदर कुसुम हिचे लग्नानंतरचे नांव जयश्री भगवान ताटे असे होते. सदर जयश्री ही मयत झाली असून तिने दि. १६/०४/२००९ रोजीच्या मृत्यूपत्राने तिच्या सर्व मिळकती वादी यांस दिलेल्या आहेत. वादी हे आंगणेवाडीमध्ये रहात असून वादी यांची पूर्वी अनुसयासाठी व तिचे पश्चात जयश्री भगवान ताटे हिच्यासाठी दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट होती व सध्याही आहे. अनुसया हिची वारस जयश्री ताटे ही असताना अनुसया हिच्या पश्चात तिचे वारस म्हणून सखाराम यशवंत आंगणे याने स्वतःचे नांव नोंद करुन घेतले. सदर सखाराम यशवंत आंगणे याच्या मृत्यू पश्चात त्याचा मुलगा रमेश याने स्वतःचे नांव अनुसया हिच्या मिळकतींना नोंदवून घेतले व रमेशच्या पश्चात प्रतिवादी नं. ४ ते ८ आणि रमेशची आई सुशिला यांनी स्वतःचे नांव अनुसया हिच्या मिळकतींना नोंदवून घेतले. तथापि प्रतिवादी नं. ४ ते ८ आणि सुशिला सखाराम आंगणे हे अनुसया हिचे वारस नाहीत. प्रतिवादी नं. ८ ही सुशिला हिच्या मृत्यूपूर्वी मयत झालेल्या मुलाची पत्नी आणि प्रतिवादी नं. ४ ते ६ हे तिच्या मृत्यूपूर्वी मयत झालेल्या मुलाचे मुलगे आणि प्रतिवादी नं. ७ हा तिचा मुलगा आहे. प्रतिवादी नं. ३ हिने दावा मिळकतीचे प्रतिवादी नं. ४ ते ८ हे मालक आहेत किंवा नाहीत याचा शोध न घेता दि. १३/०६/२००७ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीपत्राने त्यांचेकडून मिळकत खरेदी घेतली. त्यामुळे प्रतिवादी नं. ३ हिच्याकडे दावा मिळकतीचा मालकी हक्क कधीही आलेला नाही. त्यानंतर प्रतिवादी नं. ३ हिने दि. १८/०६/२००९ रोजी दावा मिळकत प्रतिवादी नं. १ व २ यांना नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी दिली. प्रतिवादी नं. ३ हिच्याकडे दावा मिळकतीचा मालकी हक्क आलेला नसल्यामूळे तो मालकी हक्क प्रतिवादी नं. १ व २ यांच्याकडे देखील आलेला नाही.

३. अर्जात पुढे असे कथन केले आहे की, फेब्रुवारी २०११ मधील पहिल्या

...२/—

आठवडयात उप अधीक्षक भूमि अभिलेख, मालवण यांच्या कार्यालयातून दावा मिळकतीच्या मोजणीची नोटीस वादींना प्राप्त झाली. त्यामुळे दावा मिळकतीबाबत प्रतिवादी नं. १ व २ यांच्याशी काही व्यवहार झालेला आहे व त्याबाबतचे प्रतिवादी नं. ४ ते ८ यांनी खरेदीखत केलेले आहे याबाबतची माहिती वादींना समजली. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ यांना दि. १०/०२/२०११ रोजी दावा मिळकतीची मोजणी करु नये असे नोटीसीद्वारे कळविले. त्यानंतर प्रतिवादी नं. १ व २ यांनी दावा मिळकतीच्या मोजणीचे काम केले नाही. परंतु दि. १५/०१/२०१२ पासून त्यांनी दावा मिळकतीची साफसफाई करणेस सुरुवात केली असून दावा मिळकतीत बांधकाम साहित्य आणून टाकले व दावा मिळकतीत घराचे बांधकाम करणार असल्याबाबत त्यांनी बोलून दाखविले. वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ यांच्या कृत्यास विरोध केल्यामूळे प्रतिवादी नं. १ व २ तेथून निघून गेले. त्यानंतर वादी यांनी दावा मिळकतीची माहिती घेऊन दावा मिळकतीबाबत झालेल्या दि. १३/०६/२००७ रोजी आणि दि. १८/०६/२००९ रोजीच्या खरेदीपत्रांच्या प्रमाणित प्रती घेतल्या. प्रतिवादी नं. १ व २ हे दावा मिळकतीमध्ये घराचे बांधकाम करणार आहेत असे गांवामध्ये बोलून दाखवित आहेत. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद दाव्याचा अंतिम लागेपर्यंत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादी नं. १ व २ यांनी निशाणी ५१ वर म्हणणे दाखल केलेले आहे. म्हणण्यामध्ये अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. वस्तूस्थिती म्हणून म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही मूळ कै. अनुसया संभाजी आंगणे हिच्या नांवे अधिकार अभिलेख सदरी नोंद होती. कै. अनुसया हिच्या सन १९७५ सालच्या मृत्यूपश्चात कै. अनुसया हिचा कायदेशीर वारस म्हणून फेरफार नं. १८१६० अन्वये कै. रमेश सखाराम आंगणे यांचे नांवे दावा मिळकत नोंदणेत आली. त्यानंतर कै. रमेश सखाराम आंगणे हे दि. १८/०७/१९९२ रोजी मयत झाले. त्यांचे मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून आई सुशिला सखाराम आंगणे, पत्नी साधना, मुलगे हेमंत, मनिष, दिनेश आणि भाऊ उमेश सखाराम आंगणे यांची नांवे फेरफार नं. ५० अन्वये दि. २४/०५/१९९३ रोजी दावा मिळकतीस नोंदविणेत आली. दावा मिळकत ही कै. अनुसया संभाजी आंगणे हिच्या कब्जात होती. तिच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारस म्हणून कै. रमेश सखाराम आंगणे यांच्या मालकी हक्क कब्जेवहिवाटीत होती. कै. रमेश यांचे मृत्यूपश्चात दावा मिळकत प्रतिवादी नं. ४ ते ८ यांच्या प्रत्यक्ष मालकी हक्क कब्जेवहिवाटीत होती.

५. म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादी नं. ४

ते ८ व कै. सुशिला सखाराम आंगणे यांनी दि. १३/०६/२००७ रोजी प्रतिवादी नं. ३ — वैशाली भास्कर आंगणे यांना रक्कम रु.२०,०००/— मोबदला घेऊन खरेदी दिली व सदर खरेदीपत्रा आधारे त्यांनी दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादी नं. ३ हिस दिला. सदर खरेदीपत्रा आधारे फेरफार नं. ३६० अन्वये प्रतिवादी नं. ३ हिचे नांव दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी नोंदविणेत आले. प्रतिवादी नं. ३ हिने दि. १८/०६/२००९ रोजी रक्कम रु. ५०,०००/— इतका मोबदला घेऊन प्रतिवादी नं. १ व २ यांना दावा मिळकत नोंदणीकृत खरेदीपत्रा आधारे खरेदी दिली व दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी नं. १ व २ यांना दिला. प्रतिवादी नं. १ व २ हे दावा मिळकतीचे सद्भावनापूर्वक खरेदीदार (bonafide purchaser) आहेत. प्रतिवादी नं. १ व २ यांची नांवे फेरफार नं. ४४३ अन्वये दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी नोंदविणेत आलेली आहेत.

६. म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, सर्व्हे नं. ४५(७३४) हिस्सा नं. २८/१४, क्षेत्र ७ गुंठे ही मिळकत दावा मिळकतीच्या पूर्व दिशेस लगत असून ती प्रतिवादी नं. १ व २ यांच्या मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत प्रतिवादी नं. १ व २ यांनी सन २००९ मध्ये खरेदी घेतलेली आहे. प्रतिवादी नं. १ व २ हे मुंबई येथे नोकरीधंद्यानिमित्त रहात असून मौजे आंगणेवाडी येथील ग्रामदेवता श्रीदेवी भराडी हिच्या दर्शनासाठी नेहमी त्यांचे येणेजाणे असते, तसेच मौजे आंगणेवाडी येथे त्यांचे नातेवाईक रहात असून त्यांना मौजे आंगणेवाडी येथे त्यांचे स्वत:चे घर बांधावे असे त्यांना वाटल्यामूळे त्यांना ग्रामपंचायत मसूरे—डांगमोडे यांचेकडून घर बांधण्यासाठी परवानगी घेऊन सर्व्हे नं. ४५(७३४) हिस्सा नं. २८/१४ या मिळकतीमध्ये ४५ x २७ फूट लांबी रुंदीचे घराचे बांधकाम चालू केले असून सदरील घराचे दगडी भिंतींचे बांधकाम पूर्ण झालेले असून घराचे छप्पराचे स्लॅबचे काम प्रलंबित आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी नं. १ व २ यांनी घराचे बांधकाम केलेले नाही.

७. म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, वादी हे प्रतिवादी नं. ४ ते ८ यांच्या कुटुंबियांपैकी नाहीत व त्यांनी तशी वंशावळ दाव्याकामी दिलेली नाही. तसेच कै. जयश्री भगवान ताटे हिने दि. १६/०४/२००९ रोजीचा मृत्यूपत्राचा लेख लिहून ठेवलेला नाही व तसा मृत्यूपत्राचा लेख लिहिण्याचा तीस अधिकार नव्हता. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

८. अर्ज व म्हणण्यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदविले आहेत, ते खालीलप्रमाणे.

| —: मुद्दा :— | | —: निष्कर्ष :— |
|---|---|---|
| १. वादी यांना सकृतदर्शनी केस आहे असे वादी सिध्द करतात का ? | .... | नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | वादींच्या बाजूने न्यायाच्या समतोलाचा तराजू आहे असे वादी सिध्द करतात का ? | .... | नकारार्थी. |
| ३. | मनाई न दिल्यास वादींचे अपरिमित नूकसान होणारे आहे असे वादी सिध्द करतात का ? | .... | नकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | .... | अर्ज नामंजूर करणेत येतो. |

—: का र ण मि मां सा :—

९. अर्जाच्या पृष्टयर्थ वादी यांनी निशाणी ६ वर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, निशाणी ७ वर फेरफार नं. १४५६७ च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ८ वर फेरफार नं. १८१६० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ९ वर फेरफार नं. १९९५४ च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी १० वर फेरफार नं. ५० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ११ वर फेरफार नं. ३६० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी १२ वर फेरफार नं. ४४३ च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. तसेच निशाणी ४ सोबत अ.नं. ८ वर दि. १०/०२/२०११ रोजी प्रतिवादी नं. १ व २ यांना दिलेल्या नोटीशीची स्थळप्रत, निशाणी ४ सोबत अ.नं. ९ व १० वर सदर नोटीशीची पोहोच पावती, निशाणी ४ सोबत अ.नं. ११ वर दि. १३/०६/२००७ रोजीच्या खरेदीपत्राची प्रमाणित प्रत, निशाणी ४ सोबत अ.नं. १२ वर दि. १८/०६/२००९ रोजीच्या खरेदीपत्राची प्रमाणित प्रत, निशाणी ४ सोबत अ.नं. १३ वर जयश्री भगवान ताटे हिच्या मृत्यूचा दाखला, निशाणी ४ सोबत अ.नं. १४ वर जयश्री भगवान ताटे हिचे दि. १६/०४/२००९ रोजीचे मृत्यूपत्र, निशाणी ४ सोबत अ.नं. १५ वर दावा मिळकतीची छायाचित्र व अ.नं. १६ वर सदर छायाचित्र काढल्याची पावती दाखल केलेली आहे. निशाणी ४७ सोबत अ.नं. १ वर दावा मिळकतीची दोन छायाचित्रे व अ.नं. २ वर सदर छायाचित्रे काढल्याबाबतची पावती दाखल केलेली आहे. निशाणी ५८ वर नि.दि.मु. नं. १३९/२००९ मधील दाव्याची प्रमाणित प्रत, निशाणी ५९ वर नि.दि.मु.नं. १३९/२००९ मधील प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी दिलेली कैफियत व निशाणी ५ वरील म्हणण्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६० वर नि.दि.मु.नं. १३९/२००९ मधील प्रतिवादी नं. ८ ने निशाणी १२९ वर दिलेल्या कैफियतीची प्रमाणित प्रत, निशाणी ६१ वर नि.दि.मु.नं. १३९/२००९ मधील निशाणी १३९ वरील प्रतिवादी नं. ६ ने दिलेल्या कैफियतीची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे.

याउलट, प्रतिवादी नं. १ व २ यांनी निशाणी ६२ वर फेरफार नं. १८१६० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६३ वर फेरफार नं. १६१११ च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६४ वर फेरफार नं. ५० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६५ वर फेरफार

नं. ३६० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६६ वर फेरफार नं. ४४३ च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६७ वर फेरफार नं. ४५० च्या उताऱ्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. निशाणी ५५ सोबत अ.नं. ७ वर दि. १३/०६/२००७ रोजीच्या खरेदीपत्राची प्रमाणित प्रत, निशाणी ५५ सोबत अ.नं. ८ वर दि. १८/०६/२००९ रोजीच्या खरेदीपत्राची प्रमाणित प्रत, निशाणी ६८ वर दावा मिळकतीच्या गटबुकावरुन काढलेल्या नकाशाची प्रमाणित प्रत, निशाणी ५५ सोबत अ.नं. १० वर दावा मिळकतीच्या हद्द ठराव मोजणीच्या नकाशाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे.

—: मुद्दा नं. १ ते ३ बाबत :—

१०. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही संभाजी कृष्णाजी आंगणे यांचेकडून अनुसया संभाजी आंगणे हिला वारसाहक्काने मिळालेली होती. दावा मिळकतीबाबत दुरुस्त आकारफोडपत्रक क्र. ४९ चे दि. ०७/०८/१९६३ चे झालेले आहे. वादी यांनी निशाणी ७ वर फेरफार नं. १४५६७ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे, त्यामध्ये सर्व्हे नं. ७३४ हिस्सा नं. २८/१३ या मिळकतीस सखाराम यशवंत आंगणे आणि अनुसया संभाजी आंगणे यांची नांवे नोंद झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी नं. १ व २ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये दावा मिळकत ही कै. अनुसया संभाजी आंगणे हिच्या नांवे अधिकार अभिलेख सदरी नोंद होती असे कथन केलेले आहे. वादी आणि प्रतिवादी नं. १ व २ यांनी फेरफार नं. १८१६०, फेरफार नं. ५०, फेरफार नं. ३६०, फेरफार नं. ४४३ या कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे. फेरफार नं. १८१६० या फेरफारावरुन असे दिसून येते की, अनुसया संभाजी आंगणे ही मयत झाल्यानंतर सन १९७६ मध्ये तिचा वारस म्हणून पुतण्या रमेश सखाराम आंगणे याचे नांव दावा मिळकत व अन्य मिळकतीस नोंद झाल्याचे दिसून येते. वादी यांनी फेरफार नं. १९९५४ हा फेरफार उतारा निशाणी ९ वर दाखल केला असून त्यावरुन सखाराम यशवंत आंगणे हे दि. २१/११/१९७४ रोजी मयत झाले, त्यांचा वारस म्हणून एकत्र कुटुंब पुढारी म्हणून रमेश सखाराम आंगणे याचे नांव दावा मिळकत व अन्य मिळकतींना नोंद करणेत आले व त्याबाबत सदरचा फेरफार दि. ११/०९/१९८९ रोजी मंजूर करणेत आलेला आहे. फेरफार नं. ५० हा फेरफार कै. रमेश सखाराम आंगणे हे दि. १८/०७/१९९२ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणून आई सुशिला व पत्नी साधना व प्रतिवादी नं. ४ ते ७ यांची नांवे दावा मिळकत व अन्य मिळकतींना नोंद करणेत आली. प्रतिवादी नं. १ व २ यांनी फेरफार नं. १६१११ चा उतारा दाखल केला असून सखाराम यशवंत आंगणे हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणून रमेश सखाराम आंगणे यांचे नांव त्यांच्या नांवे असलेल्या मिळकतींना वारस म्हणून दाखल करणेत आले. सदरचा फेरफार

नं. १६१११ हा दाखल केल्यानंतर उर्वरीत मिळकतींबाबत फेरफार नं. १९९५४ हा मंजूर करुन रमेश सखाराम आंगणे यांचे नांव सखाराम यशवंत आंगणे यांचे वारस म्हणून त्यांच्या सर्व मिळकतींस नोंदविणेत आले.

११. वादींतर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, अनुसया संभाजी आंगणे हिस जयश्री भगवान ताटे ही एकमेव मुलगी वारस होती, परंतु रमेश सखाराम आंगणे याने अनुसया संभाजी आंगणे हिचा वारस म्हणून केवळ स्वत:चे नांव दावा मिळकत व अन्य मिळकतींना नोंदवून घेतले. रमेश सखाराम आंगणे हा मयत झाल्यानंतर त्याचे वारस म्हणून त्याची आई आणि प्रतिवादी नं. ४ ते ८ यांची नांवे नोंदविणेत आली. अशा स्थितीत अनुसया संभाजी आंगणे हिचे वारस म्हणून जयश्री भगवान ताटे हिस दावा मिळकतीबाबत प्राप्त झालेला हक्क नष्ट होणारा नाही. ७/१२ उतारे आणि फेरफार उताऱ्यावरील नोंदी या केवळ महसूल गोळा करण्याच्या दृष्टीने तयार केले जातात, त्यावरुन कोणत्याही व्यक्तिस मालकी हक्क प्राप्त होत नाही. जयश्री भगवान ताटे ही अनुसया संभाजी आंगणे हिची एकमेव वारस असल्यामूळे तिचा दावा मिळकतीमधील मालकी हक्क जयश्री हिच्याकडे हस्तांतरीत होणारा आहे. अशा स्थितीत प्रतिवादी नं. ४ ते ८ आणि कै. सुशिला सखाराम आंगणे यांनी प्रतिवादी नं. ३ हिस दावा मिळकत खरेदी दिली तरी प्रतिवादी नं. ४ ते ८ यांना दावा मिळकतीमधील मालकी हक्क प्राप्त झालेला नसल्यामूळे तो प्रतिवादी नं. ३ यास हस्तांतरीत होणारा नाही. तसेच प्रतिवादी नं. ३ ने दावा मिळकत प्रतिवादी नं. १ व २ यांना खरेदी दिली, परंतु प्रतिवादी नं. ३ हिस दावा मिळकतीमधील मालकी हक्क प्राप्त झालेला नसल्यामूळे प्रतिवादी नं. १ व २ यांना दावा मिळकतीमधील कोणताही मालकी हक्क प्राप्त होणारा नाही. कै. जयश्री भगवान ताटे हिने वादी यांना मृत्यूपत्राने दावा मिळकत दिलेली आहे, त्यामुळे वादी हे दावा मिळकतीचे मालक बनलेले आहेत. त्यामुळे दावा मिळकतीचे संरक्षण होण्यासाठी प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त ताकिद वादीस देणेत यावी.

१२. प्रतिवादी नं. १ व २ तर्फे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकतीच्या हद्दीलगत पूर्व बाजूस असलेली सर्व्हे नं. ४५(७३४) हिस्सा नं. २८/१४ ही मिळकत देखील सन २००९ मध्ये प्रतिवादी नं. १ व २ यांनी खरेदी घेतलेली आहे व त्या मिळकतीचे ते मालक बनलेले आहेत. प्रतिवादी नं. १ व २ यांनी ग्रामपंचायत मसुरे–डांगमोडे यांची रीतसर परवानगी घेऊन सदर मिळकतीमध्ये ४५ x २७ फूट लांबी रुंदीच्या घराचे बांधकाम चालू केलेले आहे व सदर घराच्या दगडी भिंतींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. १ व २ हे कोणतेही बांधकाम करीत नाहीत. तसेच वादी यांनी त्यांची वंशावळ अर्जाकामी दिलेली नाही. तसेच जयश्री ताटे ही

कै. अनुसया संभाजी आंगणे हिची मुलगी होती याबाबत देखील पुरावा दिलेला नाही, त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

१३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. उपरोक्त नमूद केलेल्या फेरफार उताऱ्यांवरुन दावा मिळकत ही कै. सखाराम यशवंत आंगणे आणि कै. अनुसया संभाजी आंगणे यांच्या नांवे नोंद होती. फेरफार नं. १८१६० अन्वये कै. अनुसया संभाजी आंगणे मयत झाल्यानंतर सन १९७६ मध्ये तिचा वारस म्हणून रमेश सखाराम आंगणे यांचे नांव दावा मिळकतीस नोंदविणेत आले. रमेश सखाराम आंगणे हा मयत झाल्यानंतर सन १९९२ मध्ये त्याचे वारस म्हणून त्याची आई कै. सुशिला सखाराम आंगणे आणि प्रतिवादी नं. ४ ते ८ यांची नांवे दावा मिळकतीस नोंदविणेत आली. वादी, प्रतिवादी यांनी दिलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, सन १९७६ साली आणि त्यानंतर सन १९९२ साली नोंदविणेत आलेल्या फेरफारा विरुध्द कै. जयश्री भगवान ताटे हिने हरकत नोंदविलेली नाही. तसेच सदरचा फेरफार मंजूर झाल्यानंतर त्याविरुध्द उप विभागीय अधिकारी यांचेकडे अपिल देखील दाखल केलेले नाही. अनुसया संभाजी आंगणे ही मयत झाल्यानंतर तिची वारस म्हणून स्वत:चे नांव दावा मिळकतीस दाखल होण्यासाठी जयश्री ताटे हिने कोणते प्रयत्न केले याबाबत कोणताही पुरावा वादी यांनी दाखल केलेला नाही. वादी यांनी निशाणी ५८ वर नि.दि.मु.नं. १३९/२००९ मधील दाव्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. सदर दाव्यामध्ये नमूद केलेल्या मिळकतींमध्ये दावा मिळकतीचा उल्लेख केलेला नाही. नि.दि.मु.नं. १३९/२००९ हा दावा जयश्री ताटे हिने सदर दाव्यातील नमूद मिळकतींमध्ये तिचा हिस्सा आहे अशी उद्‌घोषण होऊन मिळण्यासाठी आणि निरंतर ताकिद मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी नं. १ ते ५ हे सध्याच्या दाव्यातील प्रतिवादी नं. ४ ते ८ आहेत. त्यांनी नि.दि.मु.नं. १३९/२००९ कामी स्वत:ची कैफियत दिलेली आहे आणि त्या कैफियतीमध्ये कै. सखाराम यांना कृष्णा, श्रीधर व संभाजी असे तीन भाऊ होते व संभाजी हे कै. जयश्री भगवान ताटे हिचे वडिल होते आणि सदर सखाराम, कृष्णा, श्रीधर व संभाजी यांच्यामध्ये त्यांच्या वडिलांच्या हयातीतच मिळकतींची वाटपे झाली असून वाटपाप्रमाणे सदरचे चारही बंधू मिळकतीत वहिवाट करीत असल्याचे नमूद केलेले आहे. सदर कैफियतीवरुन असे दिसून येते की, कै. जयश्री ताटे ही संभाजी यांची मुलगी होती. त्यामुळे जयश्री भगवान ताटे ही अनुसया संभाजी आंगणे यांची नात्याने मुलगी होती ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते. तथापि वादी यांनी दावा मिळकत ही अनुसया संभाजी आंगणे हिच्या वाटपास देणेत आली होती याबाबत पुरावा दिलेला नाही.

१४. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, जयश्री भगवान ताटे ही

मयत झाली असून तिने दि. १६/०४/२००९ रोजी मृत्यूपत्राने तिच्या सर्व मिळकती वादी यांना दिलेल्या आहेत. वादी हे आंगणेवाडी येथे रहात असल्यामूळे दावा मिळकतीत कै. अनुसयासाठी व तिच्या पश्चात तिची मुलगी कै. जयश्री भगवान ताटे हिच्यासाठी वादींचीच दावा मिळकतीत कब्जेवहिवाट होती आणि आहे. परंतु सदर कथनापृष्टयर्थ वादी यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. सन १९७६ मध्ये अनुसया संभाजी आंगणे ही मयत झाल्यानंतर कै. रमेश सखाराम आंगणे याचे नांव नोंद झाले. त्यानंतर रमेश आंगणे हा मयत झाल्यानंतर प्रतिवादी नं. ४ ते ८ यांच्या नांवाची नोंद दावा मिळकतीस झालेली आहे. दावा मिळकत ही दि. १३/०६/२००७ रोजी कै. सुशिला सखाराम आंगणे व प्रतिवादी नं. ४ ते ८ यांना प्रतिवादी नं. ३ हिस खरेदी दिली व त्याप्रमाणे फेरफार नं. ३६० नोंदविणेत आला. त्यानंतर प्रतिवादी नं. ३ हिने प्रतिवादी नं. १ व २ यांना दि. १८/०६/२००९ रोजी दावा मिळकत खरेदी दिली व त्याप्रमाणे फेरफार नं. ४४३ ने प्रतिवादी नं. १ व २ यांची नांवे ७/१२ स नोंदविलेली आहेत. सन १९७६ नुसार दावा मिळकतीबाबत वेगवेगळे फेरफार नोंदविणेत आले, परंतु कै. जयश्री भगवान ताटे हिने तिच्या हयातीत दावा मिळकतीच्या फेरफारांबाबत कधीही हरकत नोंदविलेली नाही. कै. जयश्री ताटे हिच्यासाठी वादी यांची दावा मिळकतीत कब्जेवहिवाट होती असे वादींचे कथन आहे. अशा स्थितीत दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरुन प्रतिवादी नं. १ व २ यांची सद्य स्थितीत दावा मिळकतीत कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येते. वादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांची दि. १६/०४/२००९ रोजीच्या मृत्यूपूर्वीपासून कब्जेवहिवाट असल्याबाबत आणि जयश्री ताटे हिने दावा मिळकतीचा कब्जा वादी यांच्याकडे हस्तांतरीत केल्याबाबत कोणताही पुरावा अर्जाकामी दिलेला नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादी यांची कब्जेवहिवाट दिसून येत नाही.

१५. दावा मिळकत ही दि. १३/०६/२००७ रोजी प्रतिवादी नं. ४ ते ८ आणि सुशिला सखाराम आंगणे यांनी प्रतिवादी नं. ३ हिस खरेदी दिली. त्यानंतर प्रतिवादी नं. ३ हिने दि. १८/०६/२००९ रोजी प्रतिवादी नं. १ व २ यांना दावा मिळकत खरेदी दिली. सदर दोन्ही खरेदीपत्रांबाबत कै. जयश्री भगवान ताटे हिने तिच्या हयातीत हरकत घेतल्याबाबत वादी यांनी पुरावा दिलेला नाही. कै. जयश्री ताटे हिने दि. १६/०४/२००९ रोजीचे मृत्यूपत्र लिहून ठेवण्यापूर्वीच दि. १३/०६/२००७ रोजीच प्रतिवादी नं. ४ ते ८ यांनी मिळकत प्रतिवादी नं. ३ हिस मिळकत हस्तांतरीत केलेली होती. अशा स्थितीत कै. जयश्री भगवान ताटे हिच्या दि. १६/०४/२००९ रोजीच्या मृत्यूपत्राने वादी यांना दावा मिळकतीचा मालकी हक्क प्राप्त होतो की कसे हा मुद्दा गुणदोषावर पुराव्याअंती ठरणारा आहे. वादींतर्फे Great Easten Energy Corporation Ltd. Vs. Jain Irrigation Systems Ltd. reported in

2010(1) BCJ 411 या निर्णयविधीचा आधार घेतलेला आहे. सदर निर्णयविधीमध्ये असे अभिक्षण केले आहे की, '' The expression "prima facie case" does imply existence of an arguable case. It also means that there must be some material which on the face of it tends to show that triable issues are involed.'' वादी यांनी सदर निर्णयविधीमधील प्रमाणाचा आधार घेऊन असा युक्तिवाद केला की, सदर दाव्याकामी काही महत्वाचे मुद्दे युक्तिवाद करण्यासारखे व पुरावा घेऊन निर्णित करण्यासारखे मुद्दे समाविष्ट आहेत. त्यामुळे दावा मिळकत ही संरक्षित होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. १ व २ विरुध्द तुर्तातुर्त ताकिद देता येईल.

१६. सदर युक्तिवादाशी न्यायालय सहमत नाही. मृत्यूपत्राने वादी यांना दावा मिळकतीमधील मालकी हक्क प्राप्त होणारा आहे किंवा कसे ही बाब दाव्याच्या अंतिम निर्णयाच्यावेळी ठरणारी आहे. परंतु दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. १ व २ हे बांधकाम करीत आहेत व त्यामुळे दावा मिळकतीचे स्वरुप बदलणार आहे ही बाब सदर अर्जाकामी वादी यांनी सिध्द करणेत आवश्यक आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांनी निशाणी ६८ वर दावा मिळकतीचा गटबुकाचा नकाशा दाखल केलेला आहे. दावा मिळकतीच्या पूर्वेस सर्व्हे नं. ४५ हिस्सा नं. २८/१४ ही मिळकत आहे व त्या मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. १ व २ हे घर बांधत असल्याचे म्हणण्यात कथन आहे. तसेच ग्रामपंचायत मसुरे—डांगमोडे यांची घर बांधकामासाठी रीतसर परवानगी घेतल्याचे प्रतिवादी यांनी म्हणण्यात कथन केलेले आहे. अशा स्थितीत वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ हे दावा मिळकतीत घराचे बांधकाम करीत आहेत ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे. त्याकरीता वादी यांनी निशाणी ४ सोबत अ.नं. १५ वर आणि निशाणी ४७ सोबत अ.नं. १ वर छायाचित्रे दाखल केलेली आहेत. सदर छायाचित्रांमध्ये चिरे आणि वाळू मिळकतीत टाकल्याचे दिसून येते. परंतु प्रतिवादी नं. १ व २ हे दावा मिळकतीत बांधकाम करीत आहेत ही बाब सदर छायाचित्रांवरुन सिध्द होत नाही. वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ हे घराचे बांधकाम करीत असल्याबाबत मसुरे—डांगमोडे ग्रामपंचायतीकडील बांधकाम परवान्याची प्रत घेऊन ती अर्जाकामी दाखल केलेली नाही. अशा स्थितीत वादी यांनी दाखल केलेल्या पुराव्यावरुन प्रतिवादी नं. १ व २ हे दावा मिळकतीत बांधकाम करीत आहेत ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. त्यामुळे वादी यांना सकृतदर्शनी केस नाही, न्यायाच्या समतोलाचा तराजू हा वादींच्या बाजूने नाही, मनाई न दिल्यास वादींचे कोणतेही नूकसान होणारे नाही. सबब, मुद्दा नं. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविणेत येत आहेत व मुद्दा नं. ४ करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

—: आ दे श :—

१. अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्याचा अंतिम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्याच्या पक्षात जाईल.

मालवण,
दिनांक : १३/०५/२०१३.

( आर. जे. पाटील )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.